# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 73/2022 दिनांक : 20.02.2022

## 1)खुन :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 19.02.2022 रोजी चे 17.15 वा. चे सुमारास, **सुमारास साठे चौक जाणाऱ्या रोडवरील होन्डा शोरुम जवळ सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे,** यातील **मयत नामे अनिल मुरलीधर शेजुळे, वय 20 वर्षे, रा. चिखली ता.जि. नांदेड**, यास यातील नमुद सहा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीच्या मोटार सायकलला आडवून आम्हास कट मारुन पुढे जातोस का म्हणुन फिर्यादीचे हातावर चाकुने मारून खुन करण्याचा प्रयत्न केला व मयत याचे मांडीवर शरीरावर वार करुन खुन केला. वगैरे **फिर्यादी राजकुमार एकनाथ शेजुळे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. हनुमान मंदिराजवळ चिखली बु.,नेरली ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 67/2022 कलम 302,307,341,143,144,148,149 भादवि सह कलम 4/25 भा.ह. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री नरुटे, मो.नं. 9823802677** हे करीत आहेत.

## 2)खुन करण्याचा प्रयत्न :–

**1)कंधार :–**दिनांक 18.02.2022 रोजी चे 20.45 वा. चे सुमारास, **गांधी चौक कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस बडी दर्गा ऊरुस कंधार येथे दर्शनासाठी लाईन लावणारे तुम्ही कोण असे म्हणुन शिवीगाळ करुन, लाथाबुक्याने मारहाण केली व साक्षीदार यास आरोपीने त्याचे जवळील चाकूने जीवे मारण्याच्या उद्देशाने डाव्या बरगडीत वार करुन गंभीर जखमी केले, फिर्यादी हा आरोपीस धरण्यास गेला असता फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने पोटात वार करीत असताना तो वार फिर्यादीने पकडल्याने हाताला जखम करुन अश्लिल शिवीगाळ केली. व खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शेख हुजेफ शेख जाकीर हुसेन, वय 20 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. खंदक गल्ली बहादरपुरा, कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 49/2022 कलम 307,294,323,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री लोणीकर, मो. नं. 9422336474** हे करीत आहेत.

**2)कंधार :–**दिनांक 18.02.2022 रोजी चे 20.45 वा. चे सुमारास, **गांधी चौक कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी फिर्यादीस चहा पित असताना दर्गा समोर झालेल्या वादाचा राग मनात धरुन गैरकायदयाची मंडळी जमवुन शिवीगाळ करुन, अंगावर थुकून कुकरीने वार केल्याने डाव्या हाताचे बोट तोडुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शोयब शकील पठाण, वय 19 वर्षे व्यवसाय मजुरी रा. चौरस्ता देगलुर नाका, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 50/2022 कलम 307,143,147,148,149,504, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री लोणीकर, मो. नं. 9422336474** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**देगलूर :–**दिनांक 19.02.2022 रोजी चे रात्री 03.30 वा. सुमारास, **फिर्यादीचे घरी मौजे खानापुर फाटा ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी चे घराचे पाठीमागून नमुद आरोपीने चोरी करण्याचे उद्देशाने घरावर चढुन घरात प्रवेश करुन चोरीचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी दिगांबर अशोक बक्कनवार, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. खानापुर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 87/2022 कलम 457,380,511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2462 केंद्रे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**बिलोली :–**दिनांक 18.02.2022 रोजी चे 17.00 वा. सुमारास, **प्रतिक कंन्सट्रक्शन भोसी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेंल्डंर प्लस कंपनीची मो.सा. क्र. एमएच–26/बी.यु.–1386 किंमती 80,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अमोल मुकुंदराव पाईकराव, वय 27 वर्षे, व्यवसाय सिव्हील इंजिनिअर रा. भोसी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 39/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1985 शिंदे, मो.क्र. 7721005064** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**मांडवी :–** दिनांक 18.02.2022 रोजी 17.20 वा. चे सुमारास, **मांडवी गावाजवळील पुला अलिकडे ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत विवेक गणपत सोनुले वय 20 वर्ष रा. पाटोदा बु. ता. किनवट जि. नांदेड** यास मो.सा. क्र. टी.एस./01–ईए–2036 चा चालक याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत याचे मोटार सायकलला समोरुन जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी साईनाथ गंगाधर सोनुले वय 39 वर्षे रा. पाटोदा बु. ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरनं. 16/2022 कलम 279,304(अ),337,338, भादवी सह कलम 184 मो.वा.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री पठाण, मो.क्र. 9834841176** हे करीत आहेत.

## 6)शासकीय आदेशाचे उल्लंघन :–

**कंधार :–** दिनांक 18.02.2022 रोजी चे 17.00 ते 21.00 वा. चे दरम्यान, **बडी दर्गा कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी सार्वजनिक ठिकाणी हजरत हाजी सय्याह सरवरे मगदुम रहे बडी दर्गाह कंधार ऊर्स संबंधाने 200 ते 250 लोक एकत्र जमवून मिरवणुक काढुन कोव्हीड नियमाचे व मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोह/2020 ज्ञानोबा रामराव गिरे, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 48/2022, कलम 188, 269, 270 भादवी सह 135 म. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.क्र. 9823391570** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**1)धर्माबाद :–** दिनांक 19.02.2022 रोजी चे 14.40 वा. चे सुमारास, **करखेली येथील देशी दारुचे दुकानाच्या बाजुस आरोपीचे घराचे बाजुला झाडा झुडपात करखेली, ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 23040/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/581 हरिष अमृतराव मांजरमकर, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 42/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री पंतोजी, मो.क्र. 8788597199** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 19.02.2022 रोजी चे 15.55 वा. चे सुमारास, **नेरली येथील आरोपीचे टिन पत्राचे गोठयात, ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 5760/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/ श्री आबेद गौसोदीन सय्यद, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 43/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2298 कसलोड, मो.क्र. 9689598742** हे करीत आहेत.

**3)इस्लापुर :–** दिनांक 19.02.2022 रोजी चे 17.15 वा. चे सुमारास, **आरोपीचे टिन पत्राचे शेड मध्ये तांबारे यांचे घराचे पाठीमागे सोनवाडी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारु किंमती 10000/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/ श्री भारत पंडीतराव सावंत, ने. पोस्टे इस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 24/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/निवळे, मो.क्र. 9423441526** हे करीत आहेत.

**4)अर्धापुर :–** दिनांक 19.02.2022 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **बाबा पेट्रोल पंप जवळील विजय धाबाचे पाठीमागील बाजूस मोकळया जागेत दाभड शिवार ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी व विदेशी दारु किंमती 8110/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/ श्री कपिल मुरलीधर आगलावे, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 42/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1074 नरवाडे, मो.क्र. 9823044724** हे करीत आहेत.

**5)भाग्यनगर :—** दिनांक 19.02.2022 रोजी चे 12.45 वा. चे सुमारास, **गुरुजी हॉस्पीटल समोर पुर्णा जाणारे रोडवर, भाग्यनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु किंमती 2240/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1333 विश्वनाथ गोविंदराव बोरकर, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 64/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/209 मंगनाळे, मो.क्र. 02462261364** हे करीत आहेत.

**6)बारड :—** दिनांक 19.02.2022 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **पांढरवाडी जवळील नांदेड ते भोकर जाणारे रोडवर शिवनेरी लंच होम हॉटेल समोरील टिन पत्री शेडमध्ये बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारु किंमती 1600/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/611 चक्रधर शिवाजी पवार, ने. पोस्टे बारड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं 17/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/640 गुट्टे, मो.क्र. 8605150156** हे करीत आहेत.

## 8)विषारी औषध पिवून आत्महत्या :—

**किनवट** :—दिनांक 10.01.2022 रोजी चे 17.00 वा.सुमारास, **मौजे धामनदरी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे श्रीकांत देवजी आडे, वय 21 वर्षे, रा. धामनदरी ता. किनवट जि. नांदेड**, हा पोटात दुखत असल्याने पोटदुखीच्या आजारास कंटाळुन राहत्या घरी कोणतेतरी विषारी औषध पिवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार देवजी लक्ष्मण आडे, वय 54 वर्षे व्यवसाय शेती रा. धामनदरी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे किनवट** आ. मृ. 07/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री वाठोरे, मो.नं. 9923282854** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 74 / 2022 दिनांक : 20.02.2022

### पोलीस अधिक्षक कार्यालयात " बाळशास्त्री जांभेकर " यांची जयंती साजरी

20 फेब्रुवारी 2022 रोजी रविवार **"बाळशास्त्री जांभेकर"** या महापुरुषाची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. या प्रसंगी **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी **मा. श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, **मा. श्री विजय कबाडे,** अपर पोलीस अधिक्षक, भोकर, **मा. श्रीमती अर्चना पाटील**, पोलीस उप–अधिक्षक, (मुख्यालय), तसेच **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन सपोउपनि उत्तम वाघमारे, सुर्यभान कागणे, पोना संजय सांगवीकर, पोकॉ विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


निंदा स्तुती कोणी न करी कोणाची ।
नाही या देहाची शुद्धी कोणा ।।
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड
उद्घाटन समारंभ